# बाल स्नेही पोलीस

## मार्गदर्शक तत्वे



Strategic Partner

CHILD RIGHTS AND YOU

Vidhayak Bharti

A Child Rights Advocacy Initiative

Content & Design by:
Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative

Registered Office: Vidhayak Bharti, C/o Santosh Shinde,
Plot No. 5/1, 11/B/11, Vishakha Society, Nagari Nivara Complex
Goregaon (E), Mumbai - 400065
email: write2vidhayakbharti@gmail.com
Tel: +91 9653368140 / +919869030382

Published in 2018

# पोलीस यंत्रणा का महत्वाची आहे...

1860

भारतीय दंड संहितेतील कलम ८२ प्रमाणे सात वर्षे वयाची पूर्ण न केलेल्या बालकांना कोणत्याही स्वरूपाच्या  गुन्हयाच्या कृत्यात दोषी धरण्यात येवू नये याची मांडणी करण्यात आलीय. **वय वर्षे 8 ते 12 या वयोगटातील मुलांची समज आणि कृतिशीलता लक्षात घेता अशा बालकांसाठी त्यांच्या वर्तणुकीत सुधार करण्याची तरतूद करण्यात आली.** 15 वर्षावरील मुलांसाठी The Reformatory School Act, 1860 तयार करण्यात आला ज्यामध्ये मुलांसाठी वय वर्षे अठरा ठरविण्यात आले. मात्र या कायदयात मुलींसाठी कोणतीही तरतूद नव्हती.

1924

ख-या अर्थाने बालकांच्या न्याय व्यवस्थेची (Juvenile Justice system) ची सुरूवात Madras Children Act, 1920 च्या माध्यमातून  झाली. या कायदयाने बालकांचे वय 14 वर्षापर्यंतच्या मर्यादेपर्यंत आणून ठेवलं. या कायदयात पहिल्यांदा प्रमाणित शाळा आणि **Remand Homes** ची संकल्पना मांडली गेली. त्यांनतर बंगाल आणि मुंबई ने मुलांसाठी Children's Act अनुक्रमे 1922 आणि 1924 साली तयार केला. ज्या कायदयाला आपण सर्वजण Bombay Children's Act, 1924 म्हणून ओळखतो.

1960

1947 साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने 1960 साली Central Children's Act, 1960 तयार केला. ज्यात मुलांचे वय 16 वर्षे पर्यंत आणि मुलींचे वय 18 वर्षे पर्यंत मांडलं. त्यानुसार मुलांची काळजी/ संगोपन आणि सुरक्षिततेची हमी घेण्यात आली.

1974

1974 साली भारत सरकारने बालकांविषयीचे धोरण पहिल्यांदा जाहीर केलं. त्यानुसार मुलांची काळजी त्यांचं पुर्नवसन आणि त्यांची देखभाल हे मुददे प्रकर्षाने मांडले गेले. त्यातुनच बळीत मुलांसाठीची देखभालीची यंत्रणा तयार करण्यात आली. 1986 सालापर्यंत प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील मुलांसाठी विशेष कायदयाची व्यवस्था केली. मात्र या सर्व राज्यांच्या कायदयात मुलांची ठरविण्यात आलेली वयं, त्यांच्यासोबतची कार्यपध्दती आणि मुलांकडे बघण्याच्या दृष्टीकोन लक्षात घेता भारत सरकारला या सर्वामध्ये मोठया प्रमाणात तफावत आढळली.

**मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून हे योग्य नाही म्हणून भारत सरकारने बाल न्याय अधिनियम 1986 तयार केला ज्यात मुलांचे वय 16 वर्षे आणि मुलींचे वय 18 वर्षे करण्यात आले.**

# पोलीस यंत्रणा का महत्वाची आहे...

2000

त्यानंतर 2000 साली **बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम 2000** ची अंमलबजावणी सुरु झाली. या कायदयात 2000 साली आणि 2006 साली काही महत्वाची संशोधनं करण्यात आली. हा कायदा मुलांच्या संरक्षणातील एक महत्वाचा कायदा समजला जातो. या कायदयाने **मुलांसाठीच्या न्यायव्यवस्थेकडे** बघण्याचा एक सकारात्मक दृष्टीकोन जोपासलाय.
**मुलांना शिक्षा करण्याच्या भूमिकेतून बदल करून मुलांसाठी पोषक वातावरण तयार करण्याचं या कायदयात म्हटलंय.** सर्वात महत्वाचं म्हणजे या कायदयात **मुलांचं आणि मुलींचे वय समान म्हणजे 18 वर्षे पूर्ण (17 वर्षे 365 दिवस)** ठरवण्यात आल होतं.

2015

२०१२ साली **दिल्लीतील निर्भया केस नंतर** दोषी मुलांना शिक्षा झालीच पाहिजे असा एकच आक्रोश होत होता. **कायद्याचा धाक गुन्ह्याचे कृत्य करणा-या मुलांना राहावा यासाठी ३१ डिसेंबर २०१५ रोजी पूर्वीचा बाल न्याय (काळजी आणि संरक्षण) कायदा** २००० बरखास्त करून नव्याने **बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण कायदा, २०१५** संसदेने पारित केला. या कायद्याची अंमलबजावणी संपूर्ण भारतात १५ जानेवारी २०१६ पासून सुरु झालीय.

**या कायदयात दोन प्रकारच्या मुलांसाठी दोन विशेष वेगळया व्यवस्था करण्यात आल्या आहेत:**

1. काळजी आणि संरक्षणाची गरज असणा-या मुलांसाठी एक व्यवस्था, आणि
2. विधिसंघर्षग्रस्त मुलांसाठी एक वेगळी व्यवस्था

**मुलांना शिक्षा करण्याऐवजी त्यांच्यात आवश्यक बदल घडवून त्यांना समाजाच्या मुख्यं प्रवाहात आणण्याचे मोठे ध्येय या कायदयात अंतर्भुत केलंय.**



Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative

# पोलीस आणि बाल हक्क संहिता

2015 सालचा अधिनियम त्यामध्ये झालेले बदल हे घडवून आणण्यासाठी सर्वात मोठा सहभाग राहिलाय तो संयुक्त राष्ट्र संघाने स्विकारलेल्या बाल हक्क संहितेचा.

**20 नोव्हेंबर 1989** साली संयुक्त राष्ट्र संघाने मुलांच्या अधिकारांच्या संहितेला मान्यता देवून आपण मुलांच्या संरक्षणासाठी कटिबध्द आहे हे जाहीर केलं.

**याच बाल हक्क संहितेला भारत सरकारने 11 डिसेंबर 1992 साली स्विकारून आणि सही करून मान्यता दिली.** याचा अर्थ भारत सरकारसुध्दा बालकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबध्द आहे. बाल हक्क संहितेतील मुदयांना धरूनच बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियमांची आखणी/ अंमलबजावणी करण्यात आलीय. म्हणूनच या अधिनियमाच्या प्रस्तावनेतच याचा उल्लेख करण्यात आलाय.



**बाल हक्क संहिता पुढील पाच महत्वाच्या तत्वावर आधारलेली आहे:**

**1. समानता आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव नको (Equality & Non-discrimination)**

**2. स्वाभिमान जपणं (Dignity & Worth)**

**3. मुलांचं ऐकणं महत्वाचं (Rights to be Heard)**

**4. मुलांच हित सर्वोत्तम (Best Interest Of Child)**

**5. ठपका ठेवून वागण नाही (Non-Stigmatisation)**

बाल हक्क संहितेला बांधील राहून, **बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम 2015,** मुलांची काळजी, संरक्षण, देखभाल आणि विकास या गोष्टींना प्राधान्य देत, **विधिसंघर्षग्रस्त मुलांबाबत** आणि **काळजी आणि संरक्षणाची गरज असणा-या मुलांबाबत** भूमिका घेतो.

# पोलीस आणि बाल हक्क संहिता

या कायदया अंतर्गत पुढील महत्त्वाच्या **वैधानिक (Statutory) समित्यांची** मांडणी केलीय..

### बाल न्याय मंडळ

जे विधिसंघर्षग्रस्त मुलांबाबत निर्णय घेतं

### बाल कल्याण समिती

जी काळजी आणि संरक्षणाची गरज असणा-या मुलांबाबत निर्णय घेतं

### विशेष बाल पोलिस पथक

जे काळजी आणि संरक्षणाची गरज असणा-या मुलांसाठी आणि विधिसंघर्षग्रस्त मुलांसाठी बालस्नेही प्रक्रिया आणि भूमिका घेतं



### जिल्हा बाल संरक्षण कक्ष

जे जिल्ह्यातील १८ वर्षाच्या आतील मुलांचे सर्वांगीण विकास आणि संरक्षण या साठी प्रयत्नशील आहे

### बाल कल्याण पोलीस अधिकारी

हा अधिकारी सहाय्यक सब इन्स्पेक्टर (ASI) पेक्षा कमी हुद्याचा नसेल

## विशेष बाल पोलिस पथक स्थापनेमागील उददेश:

- विशेष काळजी आणि संरक्षणाची गरज असणा-या आणि विधिसंघर्षग्रस्त बालकांसोबत संवेदनशिलपणे केस हाताळणारी/ व्यवस्थापन करणारी यंत्रणा तयार करणं
- संपर्कात येणा-या मुलांना/ बालकांना त्यांची आस्थेनं चौकशी केल्यानंतर त्वरीत आवश्यक ती उपाययोजना करण्यासाठीची यंत्रणा तयार करणं
- बाल कल्याण समिती आणि बाल न्याय मंडळ या सक्षम प्राधिकरणांसोबत समन्वय साधून मुलांच्या सुरक्षिततेची तजवीज करण आणि समन्वय साधणं
- सक्षम प्राधिकरणाच्या आदेशांची अंमलबजावणी करणं
- धोक्याच्या ठिकाणी असणा-या बालकांना त्या ठिकाणांवरून सोडवणूक करून सक्षम प्राधिकरणाची मदत घेणं आणि पुनर्वसन प्रक्रियेत सहकार्य करणं
- स्वयंसेवी संस्था, सरकारी यंत्रणा या मध्ये समन्वय साधत जिल्हा पातळीवर मुलांच्या सुरक्षिततेची आखणी करणं
- बालस्नेही व्यवस्था तयार करणं

# बाल स्नेही पोलीसः मार्गदर्शक तत्वे

**बाल स्नेही प्रक्रिया, वर्तन आणि अंमलबजावणी याच्यासाठी आवश्यक कायदा...**



मुलांच्या संरक्षणा साठी भारत सरकारने दोन महत्वाचे कायदे पारित केले आहेत-

१) लैंगिक अपराधांपासून बाल संरक्षण (POCSO)-२०१२ आणि

२) बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण)-२०१५,

विशेष म्हणजे हे दोन्ही अधिनियम हे वय वर्षे १८ वर्षाखालील व्यक्तीस बालक मानतात हे महत्वाचे आहे.

बाल लैंगिक शोषणा विरुद्धच्या कायद्यानुसार बालकांसोबत लैंगिक संबंध ठेवणे, बालकांच्या खाजगी शरीरास स्पर्श करणे, बालकांना अश्लील दृश दाखविणे, बालकाला लैंगिक कृत्य करण्यास प्रवृत्त करणे, बालकांसोबत अश्लील भाषा अथवा हावभाव वापरणे, बालकांचा लैंगिक व्यापारासाठी वापर करणे या गोष्टी अंतर्भूत आहेत. हा कायदा विशेषतः बाल स्नेही प्रक्रियेवर आधारित असून जलद निर्णय प्रक्रिया आणि अत्याचार ग्रस्त बालकांचे योग्य पुनर्वसन करणे हा याचा मुख्य उद्देश आहे

बाल न्याय अधिनियम (बालकांची काळजी आणि संरक्षण) २०१५ चा मुख्य उद्देश हा विधीसंघर्ष बालकांच्या आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकांच्या मुलभूत गरजांचा शोध घेउन, त्याचं योग्य संगोपन, संरक्षण, विकास, उपचार आणि सामाजिक पुनर्वसन इत्यादी प्रक्रिया मुलाचं बाल स्नेही प्रवृत्ती अंगीकारत करणं, आणि बालकांच्या हिताचे निर्णय घेणं हा आहे.

अगदी सुरवातीलाच प्रारंभिक मधे ह्या कायद्यात हे स्पष्ट केलं गेलं आहे, कि हया कायद्यात मुल केंद्रस्थानी असून मुलांच्या काळजी, संरक्षण आणि पुनर्वसनासाठी शक्यतो पूर्ण प्रयत्न केले गेले पाहिजेत.



**बाल मैत्रीपूर्ण व्यवहार हा या कायद्याचा मुख्य केंद्रबिंदू आहे.**

# बाल स्नेही या शब्दाचा अर्थ...



बाल अधिनियमाच्या कलम २ (१५) नुसार बाल स्नेही या शब्दाचा अर्थ मुलांसोबत घडणारी **"कुठलीही वर्तणूक, प्रक्रिया, सराव, वृत्ती, परिसर किंवा उपचार हे मानवीय विचारपूर्वक आणि बालकांच्या हिताचे असावेत."**

कलम २ (९) नुसार **बालकाचे सर्वोत्तम हित म्हणजे**, बालकांच्या बाबतीत कुठलाही निर्णय घेताना त्याच्या पायाभूत गरजा आणि अधिकार, त्याची स्व-ओळख, सामाजिक हित, त्याच्या शारीरिक, भावनिक आणि बौद्धिक विकास गरजा पूर्ण होतील याची दक्षता घेणे होय.

या ठिकाणी विशेष नमूद करावसं वाटतं कि विधी संघर्ष बालक अथवा काळजी आणि संरक्षणाची गरज असणारे बालक असू देत, आपल्या प्रत्येक प्रक्रियेत बाल स्नेही हि संकल्पना जोपासायला हवी. याचा अर्थ बालकांसोबतच्या आपल्या स्वभावात/वर्तनात, भाषेच्या संवाद प्रक्रियेत/लहज्यात आणि बालकाच्या सभोवतालच्या वस्तू वा वातावरणात, मग बालक पोलीस स्थानकात, बालक संस्थेत, बाल न्यायालयात, सरकारी कार्यालयात, इस्पितळात किंवा अन्य कुठेही असू देत.

# बाल स्नेही पोलीस...

पोलीस हे अनेकदा बालक आणि बालकांच्या संबंधित संरक्षण व्यवस्था यामध्ये प्रथम संपर्काचा दुवा असतात. बाल स्नेही प्रक्रियेत ते अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात. बाल अधिनियमाच्या कलम १०७ (१) नुसार " प्रत्येक पोलीस ठाण्यात, किमान एक अधिकारी, जो सहाय्यक पोलीस निरीक्षकपदाच्या दर्जा पेक्षा खाली नसेल आणि त्याच्या योग्य क्षमतेने, आणि योग्य प्रशिक्षित होऊन, त्या नुसार तो बाल कल्याण पोलीस अधिकारी म्हणून कामकाज पाहिल. "



कलम १०७ (२) नुसार प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी विशेष बाल कल्याण पोलीस पथक असावं अशी कायद्यात तरतूद केली गेली आहे, बालकांसोबत करायच्या सर्व प्रकियेत इतर सर्व आवश्यक व्यवस्थे सोबत समन्वय साधत हा बाल कल्याण पोलीस अधिकारी महत्वाची भूमिका पार पाडेल.

मुलांच्याप्रती बाल स्नेही वातावरण तयार करण्यासाठी कटिबद्ध होऊ या...



Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative

# बाल स्नेही पोलिस ठाणे: मार्गदर्शक तत्वे

## काय असावी कार्यालयीन रचना



- प्रत्येक पोलिस स्थानकात किमान एक बाल कल्याण पोलिस अधिकारी, जो सहाय्यक पोलिस दर्जाचा असावा.
- सर्व बाल कल्याण पोलिस अधिकाऱ्यांना (CWPO) तथा इतर सामान्य पोलिस अधिकाऱ्यांना एकत्रित माहिती व बालकांच्या संबंधित कायद्याचे (J.J. Act , POCSO, The Immoral trafficking Prevention Act 1986, The Child Labour ( Prohibition & Regulation )Act 2016, The Prohibition Of Child Marriage Act 2006 आणि इतर संबंधित कायदे.) नियमित माहिती व प्रशिक्षण घेतले जाईल.
- सर्व बाल कल्याण पोलिस अधिकारी व Data Entry Operator यांचे देखील प्रशिक्षण घेण्यात यावे. (Track the Missing Child Portal) बाबत
- बाल कल्याण पोलिस अधिकाऱ्यांनी विशेष बाल पोलिस कक्षा मार्फत होणाऱ्या सर्व प्रशिक्षणाला उपस्थित राहायला हवे आणि सर्व नोंदी ठेवाव्या.

## ठाण्यातील पोलीस कर्मचा-याचे वृत्ती / वर्तन

- बालकांच्या सामाजिक व आर्थिक सध्य स्थितीतील अवस्थेबाबत पूर्वग्रह ठेवू नये.
- बालकांच्या अवस्थेसाठी त्याला किंवा त्याच्या कुटुंबाला दोष देण्यात येऊ नये.
- बालकांला कुठल्याही कारणास्तव लिंग , जात , धर्म , प्रदेश अथवा सामाजिक आणि आर्थिक भेद केला जाऊ नये.
- मुलांची मानसिक स्थिती लक्षात घेतली असता त्यांच्याशी नम्रपणे वर्तन ठेवावे.
- पोलिस अधिकाऱ्याने बालकांचे म्हणणे आदराने ऐकून घ्यावे आणि त्यांना गुन्हेगारा सारखी वागणुक देऊ नये.



# बाल स्नेही पोलिस ठाणे: मार्गदर्शक तत्वे

## आपल्या पोलीस ठाण्यात परिसर आणि भौतिक रचना



- पोलिस स्थानकात बालकांना बसण्यासाठी बालकांसाठीचा विशेष आरामदायी बाल स्नेही कोपरा असावा.
- मुलींशी संवाद करण्याकरिता महिला पोलिस अधिकारी उपस्थितीत असावी.
- पोलिस स्थानकात बाल कल्याण पोलिस अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष , चाईल्ड लाईन (१०९८), बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती अध्यक्ष आणि सदस्यांचे संपर्क क्रमांक संवाद / सूचना फलकावर असावे.




- बालकांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी आणि प्रसाधन गृह असावे.
- बाल स्नेही कोपरा / खोली पोलिस स्थानकाच्या इतर विभागांपासून वेगळी असावी. त्यात रंगबीरंगी पोस्टर्स आणि विशेष तयार केलेले Furniture असावे.







- विभागात / जिल्ह्यात बालकांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या , इतर सेवाभावी संस्था यांच्यासाठी बाल स्नेही कोपऱ्यात / खोलीत बाल अधिकार संबंधात आणि विविध सेवांची माहिती देणारे IEC Material बालकांना आणि त्याच्या कुटुंबियांना उपलब्ध असावे. (ज्यात संरक्षण, कायदेशीर मदत, वैद्यकीय मदत आणि इतर आवश्यक मदतीची माहिती असेल)

# बाल स्नेही पोलिस ठाणे: मार्गदर्शक तत्वे



**“काळजी आणि संरक्षण” याची गरज असलेल्या मुलांसोबत संवाद साधणारा / संबंधित पोलिस अधिकाऱ्यानेखालील गोष्टींची काळजी घ्यावी...**



## स्वभाव आणि वागणूक...

- त्याची कार्यिक भाषा / शारीरिक भाषा, हावभाव, डोळ्यांची हालचाल, शब्द, शब्दांचा लहजा, असा असावा कि जेणे करून मुलांना सुरक्षित आणि आरामदायी वाटेल आणि कुठल्याही प्रकारे मुलांना भीती वाटणार नाही.
- मुलांसोबत संवाद करणारा पोलिस अधिकारी हा मुलांचा त्याच्या कृतीने हितचिंतक आणि प्रत्येक क्षणी मुलांच्या सर्वोत्तम हिताचे निर्णय घेणारा असावा.
- कुठल्याही प्रकारे निंदनीय अथवा शिवराळ किंवा नकारात्मक भाषा मुलांसोबत नसावी.
- पोलिस अधिकाऱ्याद्वारे मुलांना मानसिक अथवा शारीरिक हानी पोहचू नये.
- मुलांसोबत संवाद करणारा अधिकारी हा तंबाखू अथवा तत्सम (कुठल्याही) प्रकारचे मुलांशी संवाद साधताना व्यसन करू नये.
- मुलांशी संवाद साधताना पोलिस अधिकाऱ्याने मोबाईल फोन वर अथवा दुसऱ्या कुणाशी संवाद साधु नये.
- मुलांच्या उपस्थितीत दुसऱ्या कुणाला देखील ओरडू नये , जेणे करून मुलांचा कोवळं वय पाहता ते धास्तावेल अथवा घाबरून जाईल.
- मुलांची मानसिक स्थिती जाणून घेऊन त्यांच्याशी विनयपूर्वक त्यांचे कथन / जबाब (Recording) दस्तावेजावर लिहून घ्यावी.
- एखाद्या गोष्टीवर मुलांचे हस्ताक्षर/सही घ्यावयाची असल्यास, ती का केले जात आहे आणि तसे केल्यास काय होईल याची संपूर्ण माहिती त्या बालकास द्यावी आणि जर जे काही लिहिले गेले आहे त्या सोबत मुल राजी नसेल तर काय बदल असायला हवेत हे त्या मुलाला / बालकास विचारून त्यात बदल केला जायला हवा.
- मुलींसोबत सवांद साधताना विशेषत्वाने महिला असणे बंधनकारक आहे.
- बळीत मुल आणि त्याच्या कुटुंबाला (गरज भासल्यास) सर्वस्वी सुरक्षा प्रदान करायला हवी.



Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative



# बाल स्नेही पोलिस ठाणे: मार्गदर्शक तत्वे



**“काळजी आणि संरक्षण” याची गरज असलेल्या मुलांसोबत संवाद साधणारा / संबंधित पोलिस अधिकाऱ्यानेखालील गोष्टींची काळजी घ्यावी...**



- बळीत / अत्याचारग्रस्त मुलं आणि आरोपी याच्यात कुठल्याही पद्धतीने संपर्कात चौकशी दरम्यान मुलांशी संवाद साधताना / मुलांशी संबंधित व्यवहारा दरम्यान येणार नाहीत अशी काळजी घेतली जावी.
- बाल कल्याण पोलिस अधिकारी हा सध्या वेशात असावा.
- कोणत्याही प्रकारे मुलाला रातभर पोलिस स्थानकात थांबावे लागू नये.
- कायदेशीर स्वयंसेवक आणि मदतनीस उपलब्ध असल्याची बालकास व त्याच्या कुटुंबियांनामाहिती करून द्यावी.
- दृकश्राव्य माध्यमांचा वापर करून बालकाचा जावव नोंदविला जावा.
- आवश्यकता भासल्यास मुलांसोबत सकारात्मक शिस्तीने व शांत चित्ताने वागावे व मुलाच्या निरदर्शनात त्यांची चुक लक्षात आणून द्यावी.
- मुल भूकेलेल अथवा तहानलेलं राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- मुलांसोबत कुठल्याही प्रकारे गैरवर्तन व चुकीची वागणुक होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि तशा प्रकारे कुणी तक्रार केल्यास त्याची तातडीने दखल घ्यावी.
- मुलांसाठी मोफत कायदेशीर सल्ला उपलब्ध असल्याची माहिती मुल व त्याच्या कुटुंबियांना दिली जायला हवी.
- लैंगिक अत्याचाराचा बळी असलेल्या बालकांची शक्य तितक्या तातडीने वैद्यकीय तपासणी व आवश्यकता असल्यास उपचार केले जातील याकडे लक्ष द्यावे.
- अनैतिक व्यवहारामध्ये अथवा वेश्या व्यवसायात बालिका अत्याचार ग्रस्त असतील तर त्यांना काळजी आणि संरक्षणाची गरज असलेले मुलं म्हणून त्यांच्या सोबतचा व्यवहार करावा.



- सरकारी योजना व मदतीची कल्पना मुलाला / किंवा त्याच्या नातेवाईकांना उपलब्ध असल्याची माहिती करून देण्यात यावी. ( विशेषत: अत्याचार ग्रस्त व्यक्तीला मिळणाऱ्या मनोधैर्य योजने अंतर्गत सहाय्याबाबत बाबत )
- अत्याचार ग्रस्त बालकाला / त्याच्या पालकांना त्याच्या प्रकरणात पुढे काय चालले आहे याची माहिती देण्यात यावी.

# विधि संघर्षग्रस्त बालकांबाबत अनुसरायची कार्यपद्धती



**मुलांसोबत संवाद साधणारा / संबंधित पोलिस अधिकाऱ्यानेखालील गोष्टींची काळजी घ्यावी...**



- त्याची कार्यिक भाषा / शारीरिक भाषा, हावभाव, डोळ्यांची हालचाल, शब्द, शब्दांचा लहजा, असा असावा कि जेणे करून मुलांना सुरक्षित आणि आरामदायी वाटांव आणि कुठल्याही प्रकारे मुलाला भीती वाटू नये.
- मुलांसोबत संवाद करणारा पोलिस अधिकारी हा मुलांचा त्याच्या कृतीने हितचिंतक आणि प्रत्येक क्षणी मुलांच्या सर्वोत्तम हिताचे निर्णय घेणारा असावा.
- कुठल्याही प्रकारे निंदनीय अथवा शिवराळ किंवा नकारात्मक भाषा मुलांसोबत नसावी.
- मुलांसोबत संवाद करणाऱ्या अधिकाऱ्याने बालकाचा व्यक्तिगत अवकाशाचे उल्लंघन करू नये अथवा बालकाशी शारीरिक संपर्क येणार नाही याची दक्षता घ्यावी.
- पोलिस अधिकाऱ्याद्वारे मुलांना मानसिक अथवा शारीरिक हानी पोहचू नये.
- मुलांसोबत संवाद करणारा अधिकारी हा तंबाखू अथवा तत्सम कुठल्याही प्रकारचे मुलांशी संवाद साधताना व्यसन करू नये.
- मुलांशी संवाद साधताना पोलिस अधिकाऱ्याने मोबाईल फोन वर दुसऱ्या कुणाशी संवाद साधु नये.
- मुलांच्या उपस्थितीत दुसऱ्या कुणाला देखील ओरडू नये , जेणे करून मुलांचा कोवळ वय पाहता ते धास्तावेल अथवा घाबरून जाईल.
- बालकांशी व्यवहार करताना अधिकाऱ्याने त्याच्याशी बाल स्नेही पद्धतीने वागावे , तो गुन्हेगार आहे अशा पद्धतीने नव्हे.
- मुलांशी संवाद साधणाऱ्या अधिकाऱ्याला बालकांच्या कायद्या विषयाची पुरेशी माहिती असावी.



# विधि संघर्षग्रस्त बालकांबाबत अनुसरायची कार्यपद्धती





व्यवहार आणि प्रक्रिया...

- बालकांचा व्यक्तिगत स्वाभिमान आणि सन्मान लक्षात ठेवून सर्व प्रक्रियांमध्ये त्यांच्याशी व्यवहार केला जावा.
- बालकांची व्यक्तिगत माहिती गोपनीय राहील याची दक्षता घेण्यात यावी.
- बालकाशी संवाद साधणाऱ्या अधिकाऱ्याने त्याचे म्हणणे आदरपूर्वक व काळजीपूर्वक ऐकून घ्यावे.
- प्रत्येक बालकाची नियमित Case Diary ठेवण्यात यावी.
- मुलांची कुठलीही माहिती , छायाचित्र किंवा ओळख हि माध्यमांमध्ये प्रसिद्ध केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
- मुलांचा जबाब त्यांची मानसिक स्थिती लक्षात घेता नम्रपणे घेतला जावा.
- एखाद्या गोष्टीवर मुलांचे स्वाक्षरी घ्यावयाची असल्यास, ते का केले जात आहे आणि तसे केल्यास काय होईल याची पूर्ण माहिती त्या बालकास द्यावी आणि जर जे काही लिहिले गेले आहे त्या सोबत मुल राजी नसेल तर काय बदल असायला हवेत हे त्या मुलाला / बालकास विचारून त्यात बदल करायला हवा.
- जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा विधि संघर्षग्रस्त बालकाला जामीन पोलिस स्टेशन मध्ये मिळेल हे पाहावे.
- मुलींसोबत सवांद साधताना विशेषत्वाने स्त्री अधिकारी असणे बंधनकारक आवश्यक आहे.
- विधि संघर्षग्रस्त बालकास व त्याच्या कुटुंबियांस आवश्यकती सुरक्षा प्रदान करण्यात यावी.
- बालकल्याण पोलिस अधिकारी (CWPO) बालकांशी संवाद साधताना साध्या गणवेशात असावा.
- कुठल्याही परिस्थितीत बालकाला रात्रभर पोलिस स्टेशन मध्ये थांबावे लागणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
- बालकाचा जबाब त्याने सांगितल्या नुसारच , त्याच्या पालकांच्या अथवा अशी व्यक्ती ज्या वर बालकाचा विश्वास असेल त्यांच्या समोर नोंदविला जावा.
- बालकाचा जबाब घेताना दृकश्राव्य माध्यमाचा वापर करावा.
- बालकांचा जबाब घेताना तो काळजीपूर्वक एकण्यात येईल याची दक्षता घ्यावी आणि कुठल्याही पद्धतीने गुन्हा कबूल करून घेण्यासाठी किंवा स्वाक्षरी करून घेण्यासाठी त्याच्यावर दबाव आणू नये.
- विधि संघर्षग्रस्त बालिकेला सुर्वोद्यापुर्वी व सूर्यास्तानंतर ताब्यात घेतले जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.



Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative

# विधि संघर्षग्रस्त बालकांबाबत अनुसरायची कार्यपद्धती





व्यवहार आणि प्रक्रिया...

- बालकांचा व्यक्तिगत स्वाभिमान आणि सन्मान लक्षात ठेवून सर्व प्रक्रियांमध्ये त्यांच्याशी व्यवहार केला जावा.
- बालकांची व्यक्तिगत माहिती गोपनीय राहील याची दक्षता घेण्यात यावी.
- बालकाशी संवाद साधणाऱ्या अधिकाऱ्याने त्याचे म्हणणे आदरपूर्वक व काळजीपूर्वक ऐकून घ्यावे.
- प्रत्येक बालकाची नियमित Case Diary ठेवण्यात यावी.
- मुलांची कुठलीही माहिती , छायाचित्र किंवा ओळख हि माध्यमांमध्ये प्रसिद्ध केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
- मुलांचा जबाब त्यांची मानसिक स्थिती लक्षात घेता नम्रपणे घेतला जावा.
- एखाद्या गोष्टीवर मुलांचे स्वाक्षरी घ्यावयाची असल्यास, ते का केले जात आहे आणि तसे केल्यास काय होईल याची पूर्ण माहिती त्या बालकास द्यावी आणि जर जे काही लिहिले गेले आहे त्या सोबत मुल राजी नसेल तर काय बदल असायला हवेत हे त्या मुलाला / बालकास विचारून त्यात बदल करायला हवा.
- जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा विधि संघर्षग्रस्त बालकाला जामीन पोलिस स्टेशन मध्ये मिळेल हे पाहावे.



Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative

# महत्वाचे समन्वय...



- **विशेष बाल पोलिस अधिकारी कक्ष (SJPU) – सर्व बैठकांना , प्रशिक्षणाना उपस्थितीत राहाणे आवश्यक आहे.**
- **बालकांशी संबंधित प्रकरणाची (Cases) माहिती पोलिस स्थानकात नोंद होईल याची दक्षता घ्यावी.**

## बालकल्याण अधिकाऱ्याने खालील संवाद व समन्वय राखावा...

**बाल कल्याण समिती (CWC)**
पोलिस स्थानकात काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांच्या सर्व प्रकरणाची माहिती बाल कल्याण समितीला सादर केली जाईल याची दक्षता घेण्यात यावी

**बाल कल्याण मंडळ (JJB)**
पोलिस स्थानकात विधि संघर्षग्रस्त मुलांच्या सर्व प्रकरणाची माहिती बाल कल्याण मंडळाला सादर केली जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

**पर्यवेक्षण अधिकारी**

**जिल्हा बाल संरक्षण कक्ष**

**जिल्हा कायदेशीर अधिकृत सेवा (District Legal Service Authority)**

**जिल्ह्यातील बाल संगोपन संस्था, बालगृह, निरीक्षण गृह, विशेष गृह, सुरक्षेचे ठिकाण आणि विशेष दत्तक संस्था यांचे प्रभारी**



**बालकांच्या सुरक्षतेसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था**



Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative

# प्रत्यक्षदर्शी नियंत्रण...

- पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ प्रभारी अधिकाऱ्याने वरील मार्गदर्शिकेचे पालन करावे आणि बाल कल्याण पोलिस अधिकारी हा इतर कामांमध्ये गुंतणार नाही, जेणे करून त्याचे बाल कल्याण संबंधित कार्यावर परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

- विशेष बाल पोलिस अधिकाऱ्यांच्या कक्ष प्रमुखाने बालकांच्या संबंधित प्रकरणांमध्ये बाल कल्याण पोलिसांमार्फत योग्य काळजीपूर्वक दखल घेतली जाईल व नोंद ठेवली जाईल याची दक्षता घ्यावी.



- सदर मार्गदर्शिकेचे पालन सर्व बालकांशी संबंधित व्यवस्थांमध्ये केले जात आहे कि नाही याची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग नियमित पाहणी करेल.

## आपल्या सर्वांच्या प्रयत्नाने...
## बाल स्नेही पोलीस स्टेशन शक्य आहे!



Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative

# आम्ही कोण...

विधायक भारती ही एक सामाजिक संस्था असून बालकांच्या अधिकारांसाठी आणि संरक्षणासाठी  कार्यरत आहे. **मुलांचं संरक्षण करणं ही मोठ्यांची जबाबदारी आहे,** हे मान्य करून बालकांसोबत कार्य करणाऱ्या समाजातील व्यवस्था ह्या **बालकेंद्री आणि बालस्नेही** असाव्यात, बालकांबाबतचे निर्णय आणि धोरणं हे बाल स्नेही आणि बालकांचे सर्वोत्तम हित जोपासणारे असावेत यासाठी विधायक भारती **प्रशिक्षणाच्या आणि इतर कार्यक्रमाच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत आहे.**

**संयुक्त राष्ट्र संघाने २० नोव्हेंबर, १९८९ रोजी स्वीकारलेल्या मुलांच्या अधिकारांच्या संहितेला प्रमाण मानून आम्ही कार्यरत आहोत.** या बाल हक्क संहितेला भारत सरकारने ११ डिसेंबर, १९९२ रोजी मान्यता दिलीय.

**आपण सर्व मोठ्या व्यक्ती मुलांचे संरक्षण करायला बांधील आहोत. याच उद्देशाने आम्ही समाजात आणि व्यवस्थांमध्ये मुलांच्या अधिकार आणि जबाबदाऱ्या प्रती भूमिका निश्चित करण्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याने कार्य करीत आहोत.**

Supported By

CHILD RIGHTS AND YOU

# विधायक भारती संपर्क

+91 9653368140
+919869030382

1st Floor, Yusuf Meherally School, Tulsiwadi Post Office, Mumbai Central (W)

write2vidhayakbharti@gmail.com

facebook.com/Vidhayak Bharti

Head Office: Vidhayak Bharti, C/o. Santosh Shinde, Plot No. 5/1, 11/B/11, Vishakha Society, Nagari Nivara Complex, Goregaon (East), Mumbai - 400065

Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative